# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मा. महासभा दि. 18/04/2018

## नगरसचिव विभाग

## // गोषवारा //

**प्रकरण क्र. 03 :-** **महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३० अन्वये विशेष समित्या गठीत करणे.**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 2 कलम 30(1) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत.

यापूर्वी महानगरपालिकेने सार्वत्रिक निवडणुक 2002 नंतर सन 2005 मध्ये कलम 30 अन्वये पुढील विशेष समित्यांची नेमणुक केलेली होती. तद्नंतर सार्वत्रिक निवडणुक 2007 व 2012 नंतर उक्त समित्या गठीत करण्यात आलेल्या नाहीत.

1) मा. क्रिडा व समाजकल्याण समिती

2) मा. पूर्व प्राथमिक व माध्यमिक शिक्षण समिती

3) मा. आरोगय परिरक्षण समिती

4) मा. गलिच्छ वस्ती निर्मूलन समिती

5) मा. पाणी पुरवठा समिती

6) मा. विधी समिती

मा. विशेष समिती गठित करताना कलमान्वये सदस्य संख्या व कोणताही कालावधी निश्चित करण्यात आलेला नाही. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 2 कलम 30(7) अनुसार महानगरपालिकेस कोणत्याही वेळी विशेष समितीचे विसर्जन करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येईल. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण 2 कलम 30(1) अन्वये विशेष समित्या गठित करणेस तसेच कलम 30(7) अन्वये सदर समितीची सदस्य संख्या व कालावधी निश्चित करणेस प्रस्तावित करण्यात येत आहे.

16/4

**(बी. जी. पवार)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**